सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील शासकीय वसतिगृहे व निवासी शाळेतील विदयार्थ्यांसाठी चादर, बेडशीट व लोकरी ब्लँकेट या वस्तूंचा पुरवठा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :- बीसीएच-२०१७/प्र.क्र.३४२ /शिक्षण-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०५ जानेवारी, २०१८

वाचा:-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:- बीसीएच-२००२/प्र.क्र. २६८/मावक-४, दि. ४ जुलै, २००३.
२. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक:- भांखस-२०१४/प्र.क्र. ८२/ भाग-III/उद्योग-४, दि. ०१ डिसेंबर, २०१६.
३. शासन परिपत्रक सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:- बैठक - २०१६ /प्र.क्र. २१/शिक्षण-२ दि. ७/८/२०१७
४. आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/शानिशा/सोयीसुविधा/ २०१७-१८/३१५९ दि. ९ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना:-

सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे व अनुसूचित जाती व नवबौध्द मुलामुलींसाठी शासकीय निवासी शाळा चालविल्या जातात. मागासवर्गीय शैक्षणिक संस्थांना सोयी-सुविधा वाढविणे या योजनेंतर्गत सदर शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांना संलग्न असलेली वसतिगृहे यांना महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ (महाटेक्स), मुंबई व महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर मर्यादित यांचेमार्फत चादर, बेडशीट, लोकरी ब्लँकेट पुरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी संदर्भीय क्र. ४ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील मागासवर्गीय शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांना संलग्न असलेला वसतिगृह विभाग यांना चादर, बेडशीट, लोकरी ब्लँकेट या वस्तूंचा पुरवठा करण्यासंदर्भात पुढील रकान्यात नमूद करण्यात आल्याप्रमाणे एकूण **रु. २,७९,६३,४८३/- (अक्षरी दोन कोटी एकोंणऐंशी लाख त्रेसष्ट हजार चारशे त्रेंशी मात्र)** इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	**वस्तुचे नाव**	**आकारमान (इंच)**	**वस्तुंची मागणी**			**प्रति नग किंमत**	**अंदाजित किंमत**	**संबंधित यंत्रणा**
			निवासी शाळा	**शासकीय वसतिगृह**	**एकूण**			
१	चादर	५४ x ९०	६०६१	१७०२५	२३०८६	३२३/-	७४,५६,७७८/-	महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या., मुंबई (महाटेक्स)/ महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर
२	बेडशीट	५४ x ९०	७३४६	२७९४९	३५२९५	३०१/-	१०६,२३,७९५/-	
३	लोकरी ब्लँकेट	६० x ९०	५८३८	१२८०९	१८६४७	५३०/-	९८,८२,९१०/-	
एकूण							**रु.२,७९,६३,४८३/-**	

उपरोक्त खरेदी संदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) वरीलप्रमाणे वस्तूचे दरकरार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडुन निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर वस्तू दरकराराने निश्चित केलेल्या दरानुसारच खरेदी करण्यात याव्यात.

२) शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांना संलग्न असलेला वसतिगृह विभाग यांच्यासाठी करण्यात आलेली खरेदी ही उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहुन करण्यात यावी. याबाबत, आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी उपरोक्त पुरवठादाराशी संपर्क साधून वरील दरकरारानुसार वस्तू पुरवठ्याबाबत अटी व शर्ती निश्चित करव्यात तसेच त्यांच्या पुरवठ्याबाबत करारनामा करावा.

३) अ) पुरवठादार संस्थेने पुरवठा करावयाच्या वस्तूंच्या आवश्यकतेनुसार नमुने आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्याकडे सदर करावेत. त्यांनी सदर नमुने मंजुर करुन ते संबंधित संस्थेकडे द्यावेत.

ब) मालाचा पुरवठा करणा-या संस्थेने संबंधित वसतिगृहाच्या अधिक्षक / गृहपाल यांच्याकडे वरील मान्य करण्यात आलेले नमूने दाखवुन त्यानुसार मालाचा पुरवठा करावा.

क) अधीक्षक/ गृहपालांनी पुरवठादाराकडुन माल मिळाल्याची पोचपावती संबंधित जिल्ह्याच्या सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचेकडे सादर करावी.

ड) शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांना संलग्न असलेला वसतिगृह विभाग यांतील प्रत्यक्ष विद्यार्थी संख्येनुसार मागणी व पुरविण्यात आलेल्या वस्तु याबाबत पडताळणी करण्याची दक्षता आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी घ्यावी. पुरवठा करणा-या संस्थांना ९० % रक्कम वस्तूंचा पुरवठा केल्यानंतर त्वरीत अदा करावी. तसेच उर्वरीत १० % रक्कम काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर अदा करावी.

२. याकरिता आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, (०१) (०६) मागासवर्गीय शैक्षणिक संस्थांवरील सोयी-सुविधा वाढविणे (वि.घ.यो.) (२२२५ ३३३१), ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा. तसेच, सदर संस्थेचे देयक सन २०१७-१८ या वर्षात निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात यावे.

३. हा आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र. ३०/२०१३ / विनियम, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये सुधारलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन, अ.क्र. ४, परि. क्र. २७ (२) (अ) नुसार प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१८०१०८१४२६४४५४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.01.08 14:32:54 +05'30'

(दि.रा. डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रतः-

१. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा) (लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
४. मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. नागपूर.
१०.महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई.
११.कार्यासन अर्थसंकल्प,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती (शिक्षण-२).